जा. क्रं. माध्य-२/म-४७६/२५७६/पुणे/९२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-४११ ००१ यांचे कार्यालय.
दिनांक :- ७/१०/१९९२

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद — पुणे ------

विषय :- इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करणेबाबत.
श्री भेकराईमाता माध्यमिक विद्यालय, भेकराईनगर
ता. हवेली जि. पुणे.

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक - शिक्षण/माध्य/८-७१ ४७६ मान्यता/९२-९३
दि. २५/८/९२

उपरोक्त विषयाधिन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, ~~१९८४~~ १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्रं. एसएसएन/१०८५/२३४८५[२४४-एन] माशि-१, दि. २९.१.८६ व दि. २०.१२.८८ च्या शासनादेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधीन राहून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर इ. ५ वी ते ७ वी च्या वर्गांना जून, १९९२ या शैक्षणिक वर्षापासून विना-अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी- १] इ. ५ वी ते ७ वीच्या वर्गांची परवानगी ही विना अनुदान तत्वावर राहिल.

२] मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३] तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरील प्रमाणे संबंधितांना कळवावे तसेच आपण सदर शाळेस १५ दिवसांचे आत भेट देऊन इ. ५ वी ते ७ वी च्या सध्या सुरु असलेल्या वर्गांची तपासणी करावी व तपासणी अहवाल व आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळवावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही आहे

[signature]
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत :- १] मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांना सविनय सादर.

२] मुख्याध्यापक श्री भेकराईमाता माध्यमिक विद्यालय भेकराईनगर ता० हवेली जि० पुणे.

Scanned by Scanner Go